# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १८ मार्च २०१७.

**सहा महानगरपालिकांच्या मतदार याद्यांवर**
**हरकती व सूचनांसाठी २० पर्यंत मुदत वाढ**
**-राज्य निवडणूक आयुक्त**

मुंबई, दि. १८: भिवंडी- निजामपूर, मालेगाव, लातूर, परभणी, चंद्रपूर व पनवेल महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय मतदार याद्यांवर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी २० मार्च २०१७ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, यापूर्वी देण्यात आलेल्या मतदार यादी कार्यक्रमानुसार प्रभागनिहाय मतदार याद्यांवर हरकती व सूचना दाखल करण्याची मुदत १८ मार्च २०१७ पर्यंत होती; परंतु लोकप्रतिनिधी व नागरिकांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन मुदत वाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उद्या (ता. १९) सार्वजनिक सुट्टी असली तरीदेखील हरकती व सूचना स्वीकारण्यात येतील. मुदत वाढ दिल्यामुळे आता प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या २४ मार्च २०१७ रोजी प्रसिद्ध होतील; तर मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या २५ मार्च २०१७ रोजी प्रसिद्ध केल्या जातील.

0-0-0